**प्रेस नोट** **दि.३१/०७/२०१९**

पोलीस दलामध्ये प्रदिर्घ सेवा बजावून पोलीस दलामधून माहे जुलै अखेर सेवानिवृत्त होणारे ०३ सहायक पोलीस आयुक्त व १८ पोलीस अमंलदार असे एकूण २१ पोलीस अधिकारी/अमंलदार यांचे सेवानिवृत्तीचा कार्यक्रम दिनांक ३१/०७/२०१९ रोजी १७.०० वा. पोलीस आयुक्त कार्यालयाचे कॉप्स एक्सलन्स हॉल मध्ये मा.सह पोलीस आयुक्त डॉ. रविंद्र शिसवे यांचे अध्यक्षतेखाली पार पडला.

मा. सह पोलीस आयुक्त डॉ.रविंद्र शिसवे यांनी सेवानिवृत्त होणारे पोलीस अधिकारी व अमंलदार यांना शाल, श्रीफळ व बोधचिन्ह देवून सन्मानित केले. मा.सह पोलीस आयुक्त डॉ. रविंद्र शिसवे यांनी सेवानिवृत्त होणारे पोलीस अधिकारी, अमंलदार व त्यांचे कुटूंबियांना मार्गदर्शन करताना **''आपण सेवानिवृत्त होताय, आमचा निरोप घेताय हे जरी खरे असले तरी तुमच्याशी असलेले आमचे नाते सदैव अबाधित राहिल.''** अशी भावना व्यक्त करुन सेवानिवृत्ती नंतरचे आयुष्य सुखा-समाधानाचे व आरोग्यदायी जावो अशी मनोकामना व्यक्त केली.

सेवानिवृत्त होणा-या अधिका-यांपैकी गुन्हे शाखा युनिट -२ चे सहायक पोलीस आयुक्त श्री. भानुप्रताप बर्गे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना पोलीस दलातील आपले विविध अनुभव, सांगितले व पोलीस दलातील आपले सेवेबद्दल समाधान व्यक्त केले. सेवानिवृत्त होणा-या सहायक पोलीस आयुक्त श्रीमती उज्वला पिंगळे व त्यांचे सहचारी श्री. नंदकुमार पिंगळे यांनी त्यांचे मनोगत व्यक्त केले. तसेच सेवानिवृत्त होणा-या काही पोलीस अमंलदार व त्यांचे कुटूंबियांनी पोलीस दलातील आपले अनुभव कथन करुन मनोगत व्यक्त केले.

सदर कार्यक्रमाला मा.सह पोलीस आयुक्त डॉ.रविंद्र शिसवे, अपर पोलीस आयुक्त, प्रशासन डॉ.संजय शिंदे, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे श्री अशोक मोराळे, पोलीस उप आयुक्त, मुख्यालय श्री.विरेंद्र मिश्रा व पोलीस उप आयुक्त,विशेष शाखा श्री. मितेश घट्टे तसेच सेवानिवृत्त पोलीस अधिकारी/अमंलदार व त्यांचे कुटूंबिय हजर होते.

कार्यक्रमाची प्रस्तावना श्री.विरेंद्र मिश्रा, पोलीस उप-आयुक्त, मुख्यालय, आभार प्रदर्शन श्री.मितेश घट्टे, पोलीस उप-आयुक्त, विशेष शाखा, कार्यक्रमाचे आयोजन श्री.कल्याणराव विधाते,स.पो.आ.मा.सं.वि यांनी केले.


EXCELLENCE


EXCELLENCE






COPS EXCELLENCE
COPS EXCELLENCE